**ठळक बातम्या**

- २०२५ चा शांततेचा नोबेल पुरस्कार व्हेनेझुएलाच्या मारिया कोरीना मच्याडो यांना जाहीर
- पीएम धन-धान्य कृषी योजना आणि डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता मोहिमेचा उद्या प्रधानमंत्र्यांच्या हस्ते प्रारंभ / राज्यातला कार्यक्रम पुण्यात कृषीमंत्र्यांच्या उपस्थितीत होणार
- नागपूरमधे जागतिक दर्जाचं कन्व्हेन्शन सेंटर उभारण्याच्या समझोता करारावर स्वाक्षऱ्या

**आणि**

- भारत - वेस्ट इंडिज दुसरा क्रिकेट कसोटी सामना सुरु/ यशस्वी जयस्वालचं शतक

**<><><><><>**

२०२५चा शांततेचा नोबेल पुरस्कार व्हेनेझुएलाच्या मारिया कोरीना मच्याडो यांना जाहीर झाला आहे. व्हेनेझुएलामध्ये नागरिकांच्या लोकशाही हक्कांचं रक्षण आणि हुकुमशाहीपासून लोकशाहीकडे देशाची वाटचाल शांततेत व्हावी, यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल हा पुरस्कार दिल्याची घोषणा नॉर्वेच्या नोबेल समितीनं केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजनेचा प्रारंभ उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्लीत पुसा इथं होणार आहे. देशात विविध ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमांत सहभागी शेतकरी दूरस्थ पद्धतीनं सहभागी होणार आहेत.  राज्यस्तरीय कार्यक्रम पुण्यात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमात कृषी क्षेत्रात प्रयोगशील आणि प्रगतिशील कामगिरी करणारे ३०० हून अधिक शेतकरी सहभागी होणार असल्याचं कृषीमंत्री भरणे यांनी सांगितलं.

केंद्र आणि राज्य शासनाच्या कार्यान्वित असलेल्या ३६ हून अधिक योजना राबवून पिकांची उत्पादकता वाढवणं, पीक उत्पादनाची शाश्वतता सुनिश्चित करणं, तसंच काढणी पश्चात तंत्रज्ञान आणि पतपुरवठा प्रणाली मजबूत करण्याच्या उद्देशानं देशातल्या १०० जिल्ह्यांची निवड केंद्र सरकारनं केली आहे. त्यात राज्यातल्या पालघर, रायगड, धुळे

छत्रपती संभाजी नगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या नऊ जिल्ह्यांची निवड झाली आहे.

**<><><><><>**

भारत आंतरराष्ट्रीय तांदूळ परिषद २०२५ ची सर्व दालनं भरली असल्याची माहिती भारतीय तांदूळ निर्यात महासंघानं दिली. ही परिषद ३० आणि ३१ ऑक्टोबरला नवी दिल्लीत भारत मंडपम इथं होणार आहे.

या परिषदेत सुमारे १५० तांदूळ उत्पादक सहभागी होणार असून त्यात तांदूळ उत्पादनाशी संबंधित विविध नवकल्पना, तंत्रज्ञान आणि प्रीमियम तांदळाच्या विविध जाती सादर केल्या जातील. जागतिक तांदूळ उद्योगाच्या इतिहासातली ही सर्वात मोठी परिषद असून यात  ८० हून अधिक देशांतले एक हजारांहून अधिक खरेदीदार आणि देशातले पाच हजारांहून अधिक शेतकरी सहभागी होणार आहेत.

या परिषदेत जीआय-टॅग मिळालेले काला नमक राइस, काली काशा, गोविंद भोग, इंद्रायणी जोहा राइस आणि ब्लॅक राइस या तांदळाच्या जाती बघायला मिळणार आहेत. तांदळाच्या या जाती त्या त्या प्रदेशांत लोकप्रिय असल्या तरी या परिषदेच्या माध्यमातून त्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळण्याची संधी पहिल्यांदाच मिळणार आहे.

**<><><><><>**

नीती आयोगानं कर धोरणावरच्या अहवालाचा दुसरा भाग 'भारतातील करांमधील बदल : गुन्हेगारीकरणाला आळा घालणे आणि विश्वासाधारित प्रशासन ' आज नवीदिल्लीत प्रकाशित केला. नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बीव्हीआर सुब्रमण्यम यांनी हा अहवाल प्रकाशित केला. सर्व प्रकारचे दिवाणी पर्याय संपुष्टात आल्यानंतर कोणत्या प्रकरणांमध्ये फौजदारी कलमं लावायची याविषयी यात मार्गदर्शन केलं आहे. कर प्रणातील काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना याचा फायदा होईल. जागतिक दर्जाची कर प्रणाली निर्माण करुन, अनुपालनाच्या सोप्या आणि न्याय पद्धती लागू करण्यावर सुब्रमण्यम यांनी भर दिला.

**<><><><><>**

रिझर्व बँकेचे डेप्युटी गवर्नर म्हणून शिरिषचंद्र मुर्मू यांनी काल पदभार स्वीकारला.  ते यापूर्वी रिझर्व बँकेच्या कार्यकारी संचालक पदावर होते. या पदाची जबाबदारी  तीन वर्षे त्यांच्याकडे असेल.

<><><><><>

मानसिक आरोग्य दिन आज जगभरात साजरा केला जात आहे. मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांबाबत जनजागृती आणि मानसिक आरोग्य निरोगी राखण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना चालना देणं हा या दिवसाचा उद्देश आहे. आपत्ती आणि आणिबाणीच्या परिस्थितीत मानसिक आरोग्य अशी या वर्षीच्या जागतिक मानसिक आरोग्य दिनाची संकल्पना आहे.

हा दिवस भावनिक आणि मानसिक आरोग्याला प्राधान्य देण्याची आठवण करून देतो असं केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी समाज माध्यमावरील संदेशात नमूद केलं आहे. मानसिक आरोग्याबाबत जनजागृती वाढवण्याची आणि खुलेपणानं संवाद साधण्याची ही महत्त्वाची संधी असल्याचं नड्डा यांनी नमूद केलं.

<><><><><>

सांस्कृतिक कार्यक्रमांना हक्काचं व्यासपीठ मिळावं याकरता  नागपुरात सर्व सोयी सुविधायुक्त जागतिक दर्जाचे ' कन्व्हेन्शन सेंटर' उभारण्यात येणार आहे. याप्रकल्पासाठी स्पेन मधल्या फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसमवेत  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज सामंजस्य करार करण्यात आला. नागपूरला उभारण्यात येणारे 'कन्व्हेन्शन सेंटर' साठी निवडण्यात येणारी जागा सर्व परिवहन सेवांनी उत्तमरित्या जोडलेली असावी, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

नागपूरचा इतिहास 'कन्व्हेन्शन सेंटर' ला भेट देणाऱ्या  प्रत्येकाला समजावा, अशा पद्धतीने कन्व्हेन्शन सेंटरची अंतर्गत रचना असावी, असं ते म्हणाले.

मुंबई हे भारताचंच नव्हे, तर दक्षिण आशियाचे 'पावर हाऊस' बनत आहे. त्यामुळे महाराष्ट्रसोबत काम करायला स्पेन उत्सुक असल्याचं  राजदूत जुआन अँटोनियो यांनी सांगितलं.

<><><><><>

'स्वच्छता ही सेवा' मोहिमेत दीड हजारापेक्षा जास्त ठिकाणं स्वच्छ केल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं सांगितलं. या मोहिमेत स्वच्छता मोहिम, घरोघरी स्वच्छता, चित्रकला स्पर्धा, स्वच्छ रॅली आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसारखे २ हजार ७६६ कार्यक्रम घेतले. त्यात ५९ हजारांपेक्षा जास्त लोकांनी भाग घेतला. २५ सप्टेंबरला 'एक

दिवस, एक तास, एक साथ' अंतर्गत विशेष कार्यक्रम, तर दोन ऑक्टोबरला स्वच्छ भारत दिवस आयोजित केल्याचं मंत्रालयानं सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेची निवडणूक दोन नोव्हेंबर रोजी पुण्यात होणार आहे. संघटनेचे विद्यमान अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खो-खो संघटनेचे अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अध्यक्ष पदासाठी अर्ज भरला आहे. २०१३ पासून सलग तीन वेळा अजित पवार अध्यक्ष पदावर आहेत. महासचिव पदासाठी नामदेव शिरगावकर, तर खजिनदार पदासाठी चंद्रशेखर जाधव यांनी अर्ज केले आहेत. अर्ज भरण्याची उद्याची अखेरची मुदत असल्याचं संघटनेनं सांगितलं आहे.

**<><><><><>**

राज्याच्या सर्व प्रकल्पांच्या अंमलबजावणीमागे "स्पष्ट दृष्टिकोन, जलद निर्णयप्रक्रिया आणि जबाबदार अंमलबजावणी" हे तीन महत्त्वपूर्ण स्तंभ आहेत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुंबईत "ग्लोबल फिनटेक फेस्ट"मध्ये ते काल बोलत होते. नवी मुंबई परिसरात 'तिसरी मुंबई'ची उभारणी करण्यात येणार असून त्यात 'एज्यु सिटी', 'इनोव्हेशन सिटी', 'स्पोर्ट्स सिटी' आणि 'जीसीसी सिटी' उभारण्यात येणार आहे. 'एज्यु सिटी'त १० ते १२ परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस येणार असून १ लाख विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळेल. या विद्यापीठांमध्ये जागतिक दर्जाच्या संस्था असणार आहेत. यामुळे नव्या शहराचा आणि नव्या अर्थव्यवस्थेचा विकास होणार असल्याचे ते म्हणाले. नवउद्योग, संशोधक आणि स्टार्टअप कंपन्यांना राज्य सरकारसोबत सहकार्य करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

नागपूरात आज ओबीसी संघटनांनी महामोर्चा आयोजित केला होता. कुणबी जातीच्या व्यक्तींना ओबीसी प्रमाणपत्र देण्याच्या संदर्भातला २ सप्टेंबरचा शासन आदेश रद्द करावा अशी त्यांची प्रमुख मागणी होती. मोठ्या संख्येने ओबीसी नागरिक या मोर्चात सहभागी झाले होते. नागपुरात यशवंत चौकातून सुरू झालेला मोर्चा संविधान चौकात संपुष्टात आला. त्यानंतर तिथे सभा घेण्यात आली.

**<><><><><>**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य सरकारने १५ टक्के मानधन वाढ काल जाहीर केली आहे. राज्यभरातल्या ५० हजार कर्मचाऱ्यांना जून २०२५ पासून या मानधनवाढीचा लाभ मिळेल. या कर्मचाऱ्यांच्या उर्वरित मागण्यांबाबतही शासन सकारात्मक असल्याचं आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितलं. १० वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणे, एनएचएम कर्मचाऱ्यांना इएसआयएस अंतर्गत सामाजिक सुरक्षा लाभ देणे, कर्मचारी कल्याण निधी उभारणे, यासह इतर मागण्यांवर कार्यवाही सुरू असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

ब्रिटिश नौदलाची एचएमएस रिचमंड ही नौका सध्या मुंबई बंदरावर आली आहे. यूकेचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांच्या भारत दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय नौदलाबरोबर कोकण या संयुक्त सरावात भाग घेतल्यानंतर ही नौका मुंबई बंदरात पोहोचली. भारतीय आणि ब्रिटिश नौदलांदरम्यान दरवर्षी कोकण हा संयुक्त सराव आयोजित केला जातो.

<><><><><>

भारत आणि वेस्ट इंडिज क्रिकेट संघादरम्यान दुसरा कसोटी सामना नवी दिल्लीतल्या अरुण जेटली मैदानावर खेळला जात आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. यशस्वी जयस्वाल याच्या शतकी खेळीच्या जोरावर भारताने २०० धावांचा टप्पा ओलांडला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १ बाद २४३ धावा केल्या आहेत.

//<><><><><>//